
# Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India

## भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा



Editor
Dr. Sarjerao Padmakar
Dr. Haji Nadaf
Dr. Ranjit Mane

Scanned with OKEN Scanner

**ISBN: 978-81-955177-5-6**

**Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India**
**भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा**

**Sponsored-**
Western Region, Indian Council of Social Science Research (ICSSR), Mumbai

**Editor**
Dr. Sarjerao Padmakar
Dr. Haji Nadaf
Dr. Ranjit Mane

**First Edition**: November, 2023
**Cover Page:** Dr. Haji Nadaf

**Publishers**
L.G. Publication,
Hanuman Nagar, Ujlaiwadi, Near Shivaji University,
Kolhapur

*All rights reserved. This Book or any part thereof may not be reproduced in any form without the written permission of the publisher.*

**Printed by:**
Shreekant Computers,
Daulat Nagar, Kolhapur.

**Rs: 400/-**

***Disclaimer:***

*The Views expressed by the authors in their articles, reviews etc. insight issues are their own. Editor and publisher are not responsible for them. All disputes concerning the book shall be in the court at Peth Vadgaon, Maharashtra.*

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| डॉ. सुरेश शिखरे | मौखिक परंपरा आणि इतिहासलेखन | ०१ |
| डॉ. रामचंद्र घुले | तीन सांस्कृतिक भारताच्या इतिहास मांडणीत लोकसाहित्याची संदर्भता व बहुसांस्कृतिकतेचा विद्यमान वारसा | १८ |
| डॉ. भीमराव वानोळे | आदिवासींच्या जीवनात मौखिक परंपरेचे महत्व | २६ |
| डॉ. धिरज शिंदे | मौखिक इतिहासलेखन परंपरेतील महत्वाचे साधन: पोवाडा | ३० |
| धैर्यशील जाधव | मौखिक इतिहास: स्थानिक इतिहासाची एक महत्त्वाची अभ्यासशाखा | ३६ |
| डॉ. उर्मिला क्षीरसागर | मौखिक इतिहास लेखन | ४० |
| प्रा. (डॉ.) महावीर कांबळे | सत्यशोधकी जलसे आणि आंबेडकरी जलसे यांचा अनुबंध | ४४ |
| प्रा. डॉ. गोपाळ गावडे | चंदगड परिसरातील लग्नविधी एक सांस्कृतिक संचित | ४८ |
| डॉ. श्री. महादेव इरकर | मेंढपाळ धनगर जमातीच्या लोकसाहित्यातील नीतिमत्ता व निसर्गविषयक अनुभवचित्रण | ५६ |
| डॉ. संभाजी शिंदे | लोकसाहित्य: संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती | ६२ |
| सुजाता पाटील | स्त्रीलोकगीते एक समाजशास्त्रीय अभ्यास | ७२ |
| डॉ संतोष शहापूरकर | लोकसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती | ७६ |
| डॉ. मनीषा नायकवडी | स्त्री गीते: परंपरा आणि विशेष | ८० |
| प्रा. (डॉ.) शीला रत्नाकर | लोकसाहित्यातील लोकगीतांतून घडणारे स्त्रियांचे कौटुंबिक समाजजीवन | ८८ |
| प्रा. (डॉ.) प्रशांत गायकवाड | लोकसंस्कृतीचे उपासक-वाघ्या-मुरळी | ९६ |
| डॉ. जवाहर मोरे | जागरण या लोककलेचे पारंपरिक स्वरूप | १०० |
| डॉ. सतेज दणाणे | लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरा | १०६ |


Scanned with OKEN Scanner

# लोकसाहित्य: संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती

प्रा. डॉ. संभाजी शिंदे

**प्रास्ताविक:** भारतीय समाजजीवनामध्ये विशेषकरून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये लोकसाहित्याला अधिक महत्व आहे. लोकसाहित्यामध्ये लोकमानसाचे विविध वाङ्मयीन, सांस्कृतिक, कलात्मक आविष्कार सूचित होतात. 'फोकलोअर' या अर्थी मराठीत 'लोकसाहित्य' व 'लोकविद्या' या संज्ञा रूढार्थाने वापरल्या जातात व त्यांचा आशय कित्येकदा परंपरेच्या अर्थाने असल्याचे दिसून येते. पश्चिमेकडे 'फोकलोअर' ची संकल्पना सर्वप्रथम 'समाजशास्त्र' व 'मानवशास्त्र' शास्त्रांच्या अभ्यासातून निर्माण झाली. स्वाभाविकच फोकलोअरचा अभ्यास हा लोकसंस्कृतीचा अभ्यास म्हणून सांस्कृतिक मानवशास्त्र (कल्चरल अँथ्रपॉलॉजी) याच नावाने प्रारंभीच्या काळात झालेला आहे. फोकलोअरमध्ये लोकसंस्कृतीच्या जडणघडणीतील शब्द साधने (वाच्यार्थाने वाङ्मय-लिटरेचर) व शब्देतर साधने रूढी, चालीरीती, पारंपरिक कला, कारागिरी, क्रीडा, ज्योतिष, वैद्यक इ. या सर्वांचा समावेश झालेला आहे. तरी देखील मानवशास्त्रज्ञांत याविषयी एकमत नाही.

काहींच्या मते फोकलोअर म्हणजे संस्कृतीमधील केवळ पारंपरिक शाब्द साधनेच होत, असे असले तरी, एकूणच समग्र संस्कृतीची जडणघडण होण्याच्या मुळाशी संस्कृतीमधील शब्द साधने व शब्देतर साधने या सर्वांचाच मूलभूत व सर्वगामी सहभाग असल्याचे भान एकोणिसाव्या शतकातील अभ्यासकांना आले व या सर्व बाबींचा समावेश असलेली फोकलोअर ही स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून मान्यता पावली आहे. फोकलोअरमध्ये अभिप्रेत असलेली शाब्द साधने (लोकपरंपरेतील वाङ्मय) व शाब्देतर साधने(कृतिसंबद्ध व भावसंबद्ध साधने) हे सर्व साहित्य(साधने या अर्थाने) लोक-संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याने मराठीतील व एकूणच आधुनिक भारतीय अभ्यासकांनी साधनवाचक अर्थानेच 'लोकसाहित्य' हा शब्द वापरावयाला प्रारंभ केला व तो आता रूळला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये लोकसाहित्य संकल्पना स्वरूप व व्याप्ती या अनुषंगाने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**'लोकसाहित्य' संकल्पना:**

साधारणत: इ. स. सोळाव्या-सतराव्या शतकापर्यंत जगाच्या पश्चिम भागात मध्ययुगाची समाप्ती होऊन यंत्रप्रधान आधुनिक युगाला प्रारंभ झाला. भारतात ही परिस्थिती एकोणिसाव्या शतकात आली. मुद्रणयंत्राच्या शोधामुळे लिखित साहित्याची निर्मिती आणि प्रसार यांची लाट आली आणि त्याचवेळी मुद्रणपूर्व मौखिक परंपरेतील साहित्य व संस्कृती यांचे संग्रहण व अध्ययन करण्याची गरज अभ्यासकांना वाटू लागली. या साहित्यासाठी 'फोकलोअर' ही इंग्रजी संज्ञा सर्वप्रथम विल्यम जोन्स टॉमस या इंग्लिश पुरातत्वज्ञाने १८४६ मध्ये वापरली आणि जगभर ती रुळली. वर्तमान स्थितीत मराठीत 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजी 'फोकलोअर' शब्दाचा पर्यायशब्द म्हणून रुळला असला, तरी त्यातील 'साहित्य' हा शब्द मराठीत आधीच वाङ्मय (लिटरेचर) या अर्थाने रूढ असल्याने तो

---

मराठी विभाग, आर. एन. चांडक आर्ट्स, जे. डी. बिटको, कॉमर्स अँड एन. एस. चांडक सायन्स कॉलेज, नाशिक रोड.



Scanned with OKEN Scanner

शब्दबद्ध (शाब्द) असे कथा, गीतादी साहित्य म्हणजेच लोकसाहित्य असे समजले जाते. फार तर म्हणी, उखाणे, लोकोक्ती, कोडी या शाब्द साहित्याचाही त्यात समावेश केला जातो.

'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील 'फोकलोअर' 'folklore' या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून वापरला जातो. म्हणजेच 'फोकलोअर' या शब्दाच्या कक्षेत जो आशय येतो, तोच आशय 'लोकसाहित्य' या शब्दाच्याही कक्षेत समाविष्ट होतो. लोकसाहित्यातील 'लोक' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. 'लोक' हा शब्द सामान्य माणूस किंवा स्थान या दोन्ही अर्थाने वापरला जातो. या लोकांची परंपरा असलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य अशीही त्याची उत्पत्ती सांगितली जाते. लोकसाहित्य म्हणजे सर्वसामान्य लोकांचे साहित्य. हे साहित्य लोकांकडूनच निर्माण झालेले असते. सहजपूर्णता आणि अनामिकता ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा लोकसाहित्यात असतात. लोकसाहित्याची निर्मिती प्रारंभकाळी कुणीतरी केलेली असते. त्यावेळी त्या साहित्याला नाममुद्रा असते. कालांतराने या लोकसाहित्याचा निर्माता, त्याच्यावर असलेली नाममुद्रा गळून पडते. असे वाङ्मय अपौरुषेय अनाम बनते. याचा अर्थ असा नाही की त्या साहित्याला कोणी निर्माताच नाही. लोकवाङ्मय विशिष्ट जनसमूहाने आपली जनसमूहाची निर्मिती म्हणून स्वीकारलेले असते.

भारतात समाजजीवनामध्ये 'लोक' हा शब्द प्राचीन काळापासून विविध अर्थांनी वापरला जातो. स्वर्ग, मृत्यू, पाताळ इ. त्रिभुवनांसाठी 'लोक' हे उत्तरपद म्हणून वापरले जाते. उदा., स्वर्गलोक वगैरे. आपल्याखेरीज अन्य समूहांसाठी 'लोक' शब्द वापरला जातो. हिंदी भाषेत जन, जनपद, ग्राम्य असे शब्द लोक (फोक) या अर्थाने रुळवण्याचा प्रयत्न झाला. डॉ. श्याम परमार यांनी 'लोक' शब्दाची नेमकी व्याप्ती विशद केली आहे. ते म्हणतात ''लोक' साधारण जनसमाज है, जिसमें भू-भागपर फैले हुए समस्त प्रकारके मानव सम्मिलित है। यह शब्द वर्गभेदरहित, व्यापक, एवं प्राचीन परम्पराओंकी श्रेष्ठ राशिसहित अर्वाचीन सभ्यता, संस्कृती के कल्याणमय विवेचन का द्योतक है।"[१] थोडक्यात प्राचीन काळी संस्कृतात वैदिकेतरांसाठी 'लोक' संज्ञा रूढ होती. परंतु नंतर वैदिक-वैदिकेतरांतील अंतर मिटत गेले आणि त्यातील 'लोक' शब्दाचा अर्थही व्यवहारातून गेला.

इंग्रजीमध्ये 'फोक' हा शब्द 'नागरी' (सिव्हिलाइज्ड) या शब्दाच्या विरुद्ध छटेने आणि काहीसा हेटाळणीपूर्वक वापरला जातो. मात्र 'फोकलोअर' मधील 'फोक' मध्ये ही छटा नाही. मराठी 'लोक' पदाच्या अर्थामध्ये तर ही छटा दिसून येत नाहीच. पाश्चिमात्य अभ्यासकांनी 'फोकलोअर' या शब्दाची व्याप्ती नेमकेपणाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकन, ब्रिटानिका, कोलंबिया यांसारख्या विविध पाश्चात्य ज्ञानकोशांतून एन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेससारख्या विषयकोशांतून तसेच डिक्शनरी ऑफ फोकलोअर, मायथॉलॉजी, अँड लेजंड्स ह्या बृहत् व्याख्या-कोशातून फोकलोअरच्या आशयाची व्याप्ती व स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार लोकसाहित्यात (फोकलोअर) लोकजीवनामध्ये समूहप्रतिभेच्या आणि समूहमानसाच्या अबोध प्रेरणेतून अनायासे, आपोआप निर्माण झालेले व अनायासे परंपरेने टिकत आलेले सर्व घटक समाविष्ट होतात. "त्यात कथा, गीते, म्हणी, उखाणे, कोडी, कूटे, लोकप्रचलित मंत्र इ. सर्व शाब्द (शब्दबद्ध) साहित्याबरोबरच लोकप्रचलित धर्मविधी, श्रद्धा, देवदेवता, रूढी, चालीरीती, धारणा, व्रतवैकल्ये, उपासना, सर्व कला, कारागिरी, क्रीडा, वैद्यक, अन्नवस्त्रादी नित्योपयोगी वस्तू व त्यांच्या उपयोगाच्या रीती या सर्व शब्देतर साहित्याचा समावेश होतो"[२] थोडक्यात म्हणजे सांस्कृतिक दृष्ट्या

एकाच प्रकारची मानसिक जडणघडण असलेल्या समूहाची जीवनप्रणाली लोकसाहित्यात अभि होत असते. यामागे समूहाच्या अबोध मनाची (कलेक्टिव्ह अनकॉन्शस) प्रेरणा असते. समूहजीवनातील सर्व साहित्य आपोआप सहज घडत असते. म्हणूनच लोकसाहित्याची निर्मिती आपोआप झालेली समूहाची निर्मिती असते.

प्रत्यक्षात जरी एखादे गीत वा कथा व्यक्तिनिर्मित असली, तरी त्यामागची प्रेरणा समूहाची असते. त्यावर विशिष्ट व्यक्तीची नाममुद्रा नसते. व्यक्तीची मालकी नसते, तर समूहाची मालकी असते. समूहप्रेरणेने निर्माण झालेले साहित्य समूहस्वीकृत असेल तर समूहमन ते जतन करते. हे जतन मौखिक होते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते आपोआप जाते. देशकालपरिस्थितीनुसार त्यात बदल होतो. पण तोही समूहप्रेरित व समूहस्वीकृत असतो. या अर्थाने लोकसाहित्य सदैव प्रवाही असते. जुने असूनही समूहमनात सदैव ताजे असते. समूहाच्या इच्छेनुसार व गरजेनुसार त्यात सतत भर व बदल दोन्ही होत असते. लोकसाहित्य व नागर साहित्य किंवा अभिजात साहित्य यांच्या संबंधाविषयी विविध मते आहेत. सर्व साहित्याचे मूळ लोकसाहित्यात आहे तर लोकसाहित्य अभिजात साहित्याचे भ्रष्ट अनुकरण असते, असे दुसरे एक टोकाचे मत आहे. प्रत्यक्षात लोकसाहित्य व अभिजात साहित्य यांत सतत देवाणघेवाण व अभिसरण चालू असते. लोकपरंपरा आणि अभिजात परंपरा परस्परपोषक राहिल्या, तरच दोन्हींचा निरामय विकास संभवतो.

लोकसाहित्य ही फोकलोअरसाठी पर्यायी मराठी संज्ञा प्रथम सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ लोकसाहित्यविशारद दुर्गाबाई भागवत यांनी वापरली व पुढे ती रुळली. मराठीतील लोकसाहित्याचे आद्य चिकित्सक अभ्यासक वि. का. राजवाडे यांनी १९२५ मध्ये प्रथम 'लोककथा' व 'लोकगीत' शब्द वापरले. पुढे त्या पारिभाषिक संज्ञा म्हणून मान्यता पावल्या. फोकलोअर या इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून दत्तो वामन पोतदार यांनी 'लोकविद्या' ही संज्ञा सुचविली होती परंतु ती रूढ होऊ शकली नाही. "भारतीय लोकसाहित्याचे गाढ व्यासंगी अभ्यासक डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी 'लोकवार्ता' ही संज्ञा हिंदीतून लेखन करताना सुचविली आणि ती हिंदीत रूढ आहे. 'लोकसाहित्य' ही संज्ञाही हिंदीत रुळली आहे. 'ग्रामसाहित्य,' 'लोकयान' या संज्ञा मात्र हिंदीत रूढ होऊ शकल्या नाहीत."[३] पं. कृष्णदेव उपाध्याय यांनी फोकलोअरला सार्थ पर्याय म्हणून 'लोकसंस्कृती' ही संज्ञा आग्रहाने सुचविली आहे. परंतु मराठीतील लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते 'लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती नव्हे.' त्यांच्या मते दोन्हींचे घटक समान असले तरी एक नव्हेत. लोकसाहित्य हे लोक-संस्कृतीच्या अभ्यासाचे साधन होऊ शकते. मराठीत ज्यांनी अत्यंत सखोल आणि व्यापक भूमिकेतून लोकसाहित्याभ्यास केला, ते डॉ. रा. चिं. ढेरे मात्र पं. कृष्णदेव उपाध्याय यांच्याप्रमाणेच लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती असे मानणारे आहेत. त्यांच्या सर्व संशोधनातून त्यांच्या या भूमिकेचा प्रत्यय येतो. 'लोकसंस्कृतीचे शब्दरूप लोकवाङ्‌मयात (फोक लिटरेचर) असते तर लोकसंस्कृतीचे कृतिरूप हे लोकाचार, लोकरूढी, लोकभ्रम इत्यादींत असते. लोकसंस्कृती हे लोकसाहित्याचे व्यक्त रूप असते.' असा ढेरे यांच्या प्रतिपादनाचा आशय होय.

अमेरिका, जर्मनी, रशिया या वैज्ञानिक दृष्ट्या प्रगत असलेल्या राष्ट्रांतील विद्यापीठांमध्ये लोकसाहित्याभ्यासाच्या स्वतंत्र शाखा आहेत. या विषयावर मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती होत आहे. आकाशात झेप घेतानाही माणसाची मातीची ओढ संपत नसावी, म्हणूनच मानवमात्राचे आ

मूहमन त्याला पुन्हा पुन्हा आपल्या मुळाकडे खेचत असावे. भारतातही अनेक विद्यापीठांतून लोकसाहित्याभ्यासाच्या स्वतंत्र शाखा सुरू झाल्या आहेत. अनेक मानव्यविद्याशाखांतील अभ्यासक व्रतिपणे संशोधन करीत आहेत. म्हैसूर विद्यापीठात मानसगंगोत्री येथे लोकसाहित्य - संग्रहालय राहिले आहे. राजस्थानातही लोकसाहित्य-संग्रहालय आहे. लोककलांच्या अभ्यासासाठी आणि जतन-संवर्धनासाठी भारताचे सांस्कृतिक खाते सतत प्रयत्नशील आहे. केरळमधील काही अभ्यासक फोकलोअर या नावाची एक लघुपत्रिका उत्स्फूर्तपणे प्रकाशित करतात. जागतिक पातळीवरील अभ्यासकांमध्ये संपर्क साधता यावा म्हणून दरवर्षी आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चासत्रांचे आयोजन विविध राष्ट्रे करीत आहेत. दरवर्षी 'फोकलोअर काँग्रेस' नावाची एक परिषदही आयोजित केली जाते. लोकसाहित्याभ्यास हा केवळ भूतकाळातील संस्कृतिघटकांचा अभ्यास नसून मानवी संस्कृतीच्या आरंभापासून माणसाने अबोधपणे जतन केलेल्या जिवंत सांस्कृतिक जीवनाचा तो शोध आहे. म्हणूनच मानवाचा वर्तमान हा भूतकाळाने घडविलेला असतो आणि त्याचे भविष्य हे भूत-वर्तमानाच्या आधाराने उभे राहिलेले असते, याची समृद्ध जाण लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून येऊ शकते.

वरील वृक्षाकृतीनुसार लोककथा, लोकगीते, म्हणी व उखाणे वगैरे शाब्द लोकसाहित्याचा विचार अनेकदा होतो. परंतु भारतभरच्या असंख्य जातिजमातींची त्यांच्या त्यांच्या बोलींमधून जातिपुराणे आहेत. अभिजात संस्कृत पुराणकथांची संवादी अशी लोकभाषेतील पुराणे आहेत. अनेकदा प्रचलित व सुप्रतिष्ठित पुराणातील संकल्पनांना व कथांना छेद देणाऱ्या कथा विविध जातिजमातींच्या पुराणांतून दिसतात. जातपंचायतीचे न्यायनिवाडे करणारे नियम त्या त्या जातिजमातीत परंपरेने चालत आलेले असतात. त्यांच्या मौखिक परंपरा असतात. एकापरीने ते त्या त्या समाजाचे, समाजशासनाचे नियम असलेल्या 'स्मृति' असतात. प्रत्येक प्रगत संस्कृतीची मुळे लोकसंस्कृतीत असतात आणि लोकपरंपरेचे अनेक अवशेष प्रगत अवस्थेतही विद्यमान असतात, याचे भान लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून येते. लोकसाहित्याच्या शब्देतर परंपरेतीलही लोकरूढी, चालीरीती, व्रताचार, विधिविधाने, तोडगे यांचा विचार केला जातो. त्या परंपरेची अनेक रूपे आधुनिक जीवनसरणीतही आढळतात.

लोककलांपैकी प्रयोगात्म लोककलांचा विचार अनेकदा होतो. मात्र हस्तकलांचा पद्धतशीर अभ्यास जितका व्हायला हवा तितका भारतीय अभ्यासकांनी अद्याप केलेला नाही. अलीकडे त्याचे भान येऊ लागले आहे. "सर्व लोककलांचा उगम यातुधर्मातील श्रद्धेशी निगडित असल्याने सर्व भारतीय पारंपरिक कला धर्मश्रद्धेशी आजही बांधलेल्या आहेत. मात्र लोकक्रीडा, लोकवैद्यक व लोकज्योतिष यांचा भारतीय संदर्भातील अभ्यास व संशोधन अजूनही अलक्षित व उपेक्षित आहे."[४] भारतातल्या प्रमुख भाषांमधल्या लोकसाहित्यात लोकसंस्कृतीचे काही समान घटक आढळतात. सर्व भाषांमधल्या लोकसाहित्यात व्यक्तिजीवनातल्या विविध टप्प्यांवरच्या विधी-संस्कारप्रसंगांची गीते, श्रमपरिहारार्थ गायिली जाणारी रंजनपर गीते, सण-उत्सवांशी निगडित विधिगीते व ऋतुगीते हे प्रकार विविध व विपुल प्रमाणात आढळतात, त्याचप्रमाणे लोककथांचे अनेकविध प्रकार आढळतात, तसेच सामाजिक संदर्भ असलेली लोकनाट्ये आढळतात. जनसामान्यांची कल्पकता व चातुर्य ज्यांतून व्यक्त होते अशा म्हणी, उखाणे, कूटप्रश्न हाही लोकसाहित्याचाच एक आविष्कार आहे.

**लोकगीते**: आसामी भाषेतील बिहू गीते ही इतर प्रांतांतल्या नववर्षाच्या आगमनानिमित्त गा[...] जाणाऱ्या गीतांशी साधर्म्य दर्शवितात. बंगाली तुसू गीते, हिंदी फाग (फाल्गुम) गीते, पंजाबी [...] गीते, तमीळ तिरुविळअपात्तु ही वेगवेगळ्या प्रांतांतील प्रमुख सण-उत्सवपर गीते होत. धर्मवि[...] एक भाग म्हणून गायिली जाणारी लोकगीते हा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे व त्यात प्र[...] प्रदेशातल्या वैशिष्ट्यपूर्ण लोकसंस्कृतीनुसार वेगळेपणा व वैविध्य आढळते. भारताच्या अनेक प्रदे[...] प्रचलित असलेल्या लोकधर्मामध्ये कालीपूजेला विशेष महत्त्व आहे."केरळ, बंगाल आणि आ[...] राज्यांत हे विशेषेकरून आढळले. काली ही वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळ्या नावांनी ओळख[...] जाणारी लोकदेवता आहे. आई किंवा सितली (आसाम), अम्मन किंवा मरीअम्मन (केरळ [...] तमिळनाडू), महाराष्ट्रात आई, अंबाबाई, गौरी इत्यादी"[५]. 'देवी' ही एक साथीच्या रोगाशी संबं[...] देवता आहे व ह्या रोगनिर्मूलनासाठी धार्मिक विधिगीते गायिली जातात. वेगवेगळ्या ऋतुमानां[...] नैसर्गिक बदलांमुळे लोकमानसात जी परिवर्तने घडून येतात, त्यांची भावपूर्ण वर्णने करणारी ऋतु[...] सर्वत्र आहेत. पेरणी, कापणी अशा कृषिकर्मांच्या वेळी जो आनंद व उल्हास शेतकरीवर्गात अस[...] तोच लोकगीतांचे रुप घेऊन प्रकट होतो. अशी कृषिगीते भारतातल्या सर्व भाषांत आढळतात. श्रमि[...] लोक काम करताना श्रम हलके व्हावेत म्हणून गाणी गातात. प्रत्येक प्रदेशात ती वैशिष्ट्यपूर्ण असत[...] व त्यांत विविधताही मोठ्या प्रमाणात आढळते. बंगालमध्ये मैसाल, तमिळमध्ये तोळिलपाट्[...] सिंधीमध्ये हमरको आणि वलारो यांचे उदाहरणादाखल उल्लेख करता येतील.

जनसमुदायाच्या मनोरंजनार्थ काही लोकगीते व लोकनाट्ये रचली व सादर केली जात[...] मलयाळम् कईकोट्टिकळ्ळी, आसामी गरखिया गीत, तमिळ कोलाट्टम्, ओडिया चिताकुटा गीत [...] काही लक्षणीय उदाहरणे होत. नद्या, तलाव, समुद्र यांच्या सान्निध्यातील प्रदेशांत नौकागीते [...] कोळीगीते विपुल प्रमाणात आढळतात. "आसामी नावखेलर गीत, मलयाळम् वंचिपाट्टू, गुजरा[...] अबवाणी वा भामणी हे उल्लेखनीय प्रकार होत. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांत लग्नगीतेही विपुल [...] विविध प्रकारची आढळतात. ती विवाहाच्या वेगवेगळ्या विधींच्या प्रसंगी गायिली जातात[...] कित्येक गाणी केवळ मनोरंजनार्थ असतात. प्रत्येक भाषेत अशा लग्नगीतांची उदाहरणे आहे[...] मलयाळम्मध्ये वातील तुर अप्पाट्टू, काश्मीरीमध्ये वनवुन, उर्दूमध्ये जलवा गीते, तेलुगूमध्ये विट्या[...] वारी पाटलु, तमिळमध्ये कल्याण-अप्पाट्टू यांचे उदाहरणादाखल निर्देश करता येतील.

आसामीमध्ये लग्नगीतांच्या ह्या वर्गाला 'विया-नाम' अशी संज्ञा आहे. का[...] ठिकाणी लुटुपुटूची बेडकांची लग्ने लावून त्यांची लग्नगीतेही गायिली जातात. त्यामुळे पाऊस पडत[...] अशी लोकश्रद्धा आहे. इतिहास-पुराणांत शौर्य गाजवणाऱ्या वीरपुरुषांच्या गाथा व पोवाडे सर्व भाषां[...] आढळतात. थंडीच्या दिवसांत शेकोटी पेटवून त्याभोवती समूहाने जमून गप्पागोष्टी करणे, गा[...] म्हणणे ही प्रथा खेडोपाडी आढळते. अशा वेळी जी कथा सांगितली जाते, ती बहुधा गीतात्मक अस[...] काश्मीरी लोकगीतांमध्ये हा प्रकार विशेषत: आढळतो. धार्मिक आशयाच्या बंगाली बाऊल गीतांम[...] व काश्मीरी वातसुन गीतांमध्ये सांगीतिक गुणवत्ता विशेष आढळते. लोकगीतांमधल्या लयताला[...] प्रभाव लिखित स्वरुपाच्या नागरकाव्यामध्ये पडलेला दिसून येतो.

**लोककथा**:

भारतातील लोककथांचा वारसाही खूप समृद्ध आहे. भारतीय लोककथांच्या आधारे[...] गुणाड्याची यृहत्कथा (बड्डकहा),बोद्ध जातककथा, जैन धम्मकहा, सोमदेवाचा कथासरित्साग[...]

दंडीचे दशकुमारचरित, विष्णुशर्म्याचे पंचतंत्र व हितोपदेश इ. कथा-संकलने तयार झाली. शिवाय रामायण, महाभारत, पुराणे यांतही मौखिक परंपरेतून आलेल्या अनेकविध लोककथा अंतर्भूत आहेत. भारतातल्या आदिवासी जमातींतही वैशिष्ट्यपूर्ण लोककथा विपुल प्रमाणात आहेत. लोककथांना सांस्कृतिक महत्त्व असते. या कथा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतात व सर्वदूर प्रसृत होतात. 'लोककथा' या व्यापक संज्ञेखाली लहान मुलांच्या परीकथा, अद्भुतरम्य कथा, बोधकथा, प्राणिकथा, मिथ्यकथा, आख्यायिका, धार्मिक कहाण्या व व्रतकथा आदींचा समावेश होतो.

भारतातल्या वेगवेगळ्या प्रदेशांतल्या लोकसाहित्यात ह्या सर्व प्रकारच्या कथा विपुल प्रमाणात आढळतात. "प्रत्येक भाषेच्या लोकसाहित्यात सृष्टीच्या निर्मितीविषयीच्या मिथ्यकथा, तसेच प्राणी, वृक्ष, वेली, देवदेवता यांविषयीच्या मिथ्यकथाही मोठ्या प्रमाणात आढळतात. आख्यायिकांचे प्रमाणाही विपुल आहे. बंगालमधील अकराव्या शतकातील राजपुत्र गोपीचंद्राची आख्यायिका प्रसिद्ध आहे". गोरखनाथ व मच्छिंद्रनाथ यांच्या आख्यायिका तर भारताच्या उत्तर प्रदेशाच्या सीमा ओलांडून नेपाळ व तिबेट येथेही पसरल्या आहेत. व्रतकथा हा प्रकार भारतात खेडोपाडी सर्वत्र रुढ आहे. मूळ संस्कृत व्रतकथांवर या लोककथा आधारित असतात. उदा., सत्यनारायण व्रतकथा. व्रतकथा या देवदेवतांच्या उपासन, सणउत्सवांची व्रतवैकल्ये यांच्याशी संबंधित असतात. ह्या व्रतकथा ग्रामीण भागांतील स्त्रियांमध्ये विशेषेकरून प्रचलित आहेत. कुमारिका, नववधू व विवाहित स्त्रिया यांच्यासाठी निरनिराळी व्रतवैकल्ये व त्या व्रतांच्या पारंपारिक कथा आहेत. ह्या व्रतकथा जरी गद्यात असल्या तरी त्यांत अधूनमधून मंत्रश्लोकांची पद्यमय पारखण असते. त्यांचे पठण पारंपारिक पद्धतीने सूत्रबद्ध रीत्या केले जाते. कित्येकदा एका कथेत दुसरी उपकथा गुंफलेली असते व अशा रीतीने त्यांची साखळीच तयार होते. ह्या व्रतकथांतून नैतिक मूल्ये व शाश्वत सत्ये यांचे दर्शन घडते व त्यामुळे त्यांना सांस्कृतिक आशय लाभलेला असतो.

सत्यनारायण कथा, व्रतकथा, शिवरात्री व्रतकथा अशा काही प्रकारांत त्या व्रताची महती वर्णिलेली असते. त्यात उपवास, नैतिक शुद्ध आचरण यांवर भर असतो. मैथिलीमध्ये वटसावित्री व्रताच्या दिवशी वारीसती कथापठणाचा प्रघात आहे. व्रत केल्याने पुण्यप्राप्ती होते, पापाचा विनाश होतो, दुष्टांचा संहार होतो. इष्ट मनोकामनांची प्राप्ती होते असे तात्पर्य सांगणाऱ्या कथा आहेत, तर व्रताचे पालन न झाल्यास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात, असा इशाराही दिलेला असतो, उदा., नागपंचमीची व्रतकथा जीतीय (जीमूतवाहन) व्रतकथा इत्यादी. पुराणे व उपनिषदे यांतूनही काही व्रतकथा उगम पावल्या आहेत. मैथिलीमध्ये 'मधुश्रावणी व्रतकथा' नावाची कथांची मालिका आहे. नवविवाहितेने मधुश्रवणी व्रताच्या पहिल्या पंधरा दिवसांत ह्या पंधरा कथांचे पठण करावयाचे असते. कार्तिक मासात व्रतकथेचे पठण कौटुंबिक जीवनात सुखसमृद्धी नांदावी म्हमून केले जाते. ह्या व्रतकथा म्हणजे एका परीने नीतिवादी बोधकथाच असतात. लोकांच्या इच्छाकांक्षांचे मूर्त रुपही या कथांत प्रतिबिंबित झालेले असते.

कुमारिकांना चांगला पती मिळावा, पतिपत्नींना विवाहसौख्य लाभावे, चांगली संतती निर्माण व्हावी, सुखीसमाधानी दीर्घ कौटुंबिक जीवन लाभावे, अशा मनोकामना ह्या व्रतकथांतून व्यक्त झालेल्या दिसून येतात. कार्तिक महिन्यात हरिसन व्रतकथांचे पठण केले जाते. काही व्रतकथा काव्यात्म सौंदर्याने, वाङ्मयीन गुणांनी युक्त असतात. उदा., सपत-विपत (संपत्ती-विपत्ती) व्रतकथा ही नलदमयंतीच्या आख्यानावर आधारलेली असूनती चैत्र मासात पठण केली जाते. दुसाध या दलित

जमातीच्या साल्हेआ देवतेची व्रतकथाही अशाच स्वरुपाची आहे. भारतातल्या अनेक रा... पारंपारिक कथाकथकांच्या व्यावसायिक जमाती आहेत. कथा सांगून जनसमुदायाचे मनोरंजन... गावोगाव भटकणे हा त्यांचा परांपरागत व्यवसायच आहे. पण आधुनिक जीवनमा... मनोरंजनाची आधुनिक तंत्रसाधने उपलब्ध झाल्याने आश्रयदात्यांच्या अभावी हा व्यवसाय न... होत चालला आहे.

**लोकनाट्ये**:

लोकनाट्ये ही विविध ऋतूंतील विधी व उत्सवांतून निर्माण झाली. खेड्यातील देवाल... मंडपात, रस्त्याकडेच्या मोकळ्या आवारात वा पटांगणात लोकनाट्यांचे खेळ केले ... लोकनाट्याला लिखित संहिता नसते. त्यातील संवाद व कृती ह्या बव्हंशी उत्स्फूर्त असतात. ते ... मौखिक परंपरेतून आलेले असतात व कल्पनेने आठवून म्हटले जातात. त्यांना कित्येकदा मौ... परंपरेतील कंठसंगीताचाही जोड असते. बंगालमधील 'कृष्णयात्रा' ही प्राचीन लोकनाट्ये अ... प्रचलित आहेत. 'बंगाली जात्रा' हे त्यांचे आधुनिक रुप होय. "तमिळ तेरुक्कुटटू, कन्नड यक्षगा... वयलाट, आसामी अंकियानाट, आंध्रमधील कुरवंजी, पंजाबमधील रास व नकल, मलयाळम... काक्कारिशी, गुजरातमधील 'भवाई', महाराष्ट्रातील 'तमाशा' हे भारताच्या विविध प्रांता... लोकनाट्यांचे प्रमुख प्रकार होत"[८]. मध्य प्रदेशातील लोकनाट्य 'माच' म्हमून ओळखले ... प्रारंभीच्या लोकनाट्यांचे विषय महाकाव्ये, पुराणे यांतून घेतलेले असत व त्यांना धार्मिक अ... असे. ही लोकनाट्ये धार्मिक उत्सवांतून सादर केली जात. पण पुढेपुढे त्यांतील धार्मिकता लोप पा... जाऊन त्यांना लौकिक स्वरुप प्राप्त होत गेल्याचे दिसून येते. आधुनिक बंगाली जात्रांमधून वि... प्रकारचे विषय हाताळले जातात.

**म्हणी व उखाणे**:

म्हणी व वाक्प्रचार, तसेच कोडी व उखाणे हा भारतीय लोकवाङ्मयाचा महत्त्वाचा भा... आहे. म्हणींमधून जनमानसाचे चातुर्य व शहाणपण मोजक्या सूत्रबद्ध वा काव्यमय पंक्तींतून व्यक्त ... लोक आपल्या नेहमीच्या बोलण्यात सहजपणे म्हणी व वाक्प्रचार वापरतात. त्यांत जनजीवनात... सार्वत्रिक अनुभवांचे सारसत्त्व आळून आलेले असते. त्यांत मोजक्या शब्दांत मार्मिक सत्ये प्र... केलेली असतात. असे अनुभव समान संस्कृतीच्या पातळीवर अनेक लोकांना आलेले असल्या... जगभर निरनिराळ्या लोकसमूहांत एकाच अर्थाच्या म्हणी सापडू शकतात. भारतातही प्रांतोप्रांती ... समान म्हणींचा एकत्रित विचार केल्यास काही सामान्य अनुमाने काढता येतात. "बऱ्याचशा म्... हवामानावर आधारलेल्या असतात. पावसाची नक्षत्रे व त्यावर आधारलेला शेतकऱ्याचा सा... अनुभव हा सर्वत्र समान असल्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या म्हणींमध्येही सारखेपणा आढ... उदा. उत्तरा नक्षत्राविषयी निरनिराळ्या प्रदेशांत निर्माण झालेल्या पुढील म्हणींत साधर्म्य आढळते: ... वरस लगे ऊतरा, अन्न व खावै कूतरा (उ.प्र.), (२) जो वरसे ओत्रा, तो धान नही खाय कुत्रा (गुज... (३) पडतील उत्तरा, तर अन्न न खाय कुत्रा. 'एका हाताने टाळी वाजत नाही' या म्हणीचा उग... ह्येकेन हस्तेन तालिका सम्पद्यते'"[१] या चाणक्याच्या उक्तीत असून ही म्हण बहुतेक भारतीय भा... आढळते. 'सुनेच्या हातून भांडे फुटले तर ते सोन्याचे सासूच्या हातून फुटले तर मातीचे' या म्ह... पर्याय कानडी, गुजराती, तेलुगू व हिंदी या भाषांत सापडतात. 'उचलली जीभ लावली टाळ्याला'...

गुजराती पर्याय असा –'उपाडी जीभने लगाडी तालवे'. अशा रीतीने समान
...तीतील म्हणींचे वेगवेगळ्या भिन्नभिन्न भाषिक प्रदेशांत समानार्थी प्रचलन आढळते.

भारतात लोकोक्ती वाङ्मय फार प्राचीन असून ते आशयाने परिपूर्ण व साहित्यगुणांनी नटलेले ...त्यात भारतीय प्रज्ञेचे प्रगल्भ रुपदिसते. 'सूक्तिवाङ्मयाने वा सुभाषितांनी भारताने अद्वितीय ...निर्माण करून जागतिक वाङ्मयाला कायमचे ऋणी करून ठेवले आहे', असे विंटरनिट्झ यांचे ...भागवतांनी नोंदवून ठेवले आहे. ऋग्वेदातही वाक्यप्रचारांचा वा सूक्तींचा आढळ ...'चक्षुर्वैसत्यम्' हा वाक्प्रचार बृहदारण्यकात आला आहे व तो भारतात सर्वत्र रुढ ...रामायण, महाभारत या ग्रंथांतही अनेक लोकोक्ती-सूक्ते व सुभाषिते-आढळतात. 'तेल गेले तूप ...हाती धुपाटणे आले' हा वाक्प्रचार कथासरित्सागरातल्या एका कथेवरून आला आहे. कोडी वा ...आणि उखाणे यांना पारंपारिक भारतीय समाजजीवनात विधिविधानात्मक मोलही आहे. ...प्रसंगी वधू-वरपक्ष एकमेकांना कोडी व उखाणे घालतात. छोटा नागपूरमधील ओराओं जमात, ...सारख्या अनुसूचित जमाती व बंगालमधील हिंदू यांच्यात अजूनही ही प्रथा आहे. ह्याखेरीज ...विषयक कूटप्रश्नही आहेत.

महाराष्ट्रात तसेच भारताच्या इतर भागांतही त्यांचे प्रचलन आहे. गूढ व आध्यात्मिक ...प्रश्नांचा उगम प्राचीन वैदक वाङ्मयात आढळतो. मब्ययुगीन भारतीय वाङ्मयातही गूढ व ...आध्यात्मिक कूटप्रश्न आढळतात. धर्मामधल्या गूढ कल्पनांची अभिव्यक्ती ही कित्येकदा कूटप्रश्नांद्वारा ...जाते. त्यामुळे त्या विचारातली गूढात्म अनुभूती जतन केली जाते. महाभारतात यक्षाने ...राजाला अनेक अवघड कूटप्रश्न विचारले व धर्माने त्यांची समर्पक उत्तरे दिली, असा उल्लेख आहे. ...यान बौद्ध संप्रदायातील कूटप्रश्न, तसेच बंगालमधील प्राचीन व मध्ययुगीन काळातील नाथ ...दायाचे कूटप्रश्न हे रुपकात्मक भाषेत धर्मतत्त्वांचा प्रसार करण्यासाठी रचले गेले.

भारतीय लोकसाहित्यात पारंपारिक समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. स्त्रियांची ...विध रुपे त्यातून आविष्कृत झालेली दिसून येतात. "नववधू, सासू, सून, आई, बहीण, नणंद, ...भावजय, जाऊ अशी स्त्रीची विविध रुपे पारंपरिक लोकसाहित्यात आढळतात. सासूसून, नणंद-भावजय ही नाती सामान्यत: विरोधात्मक असतात. आई, बहीण यांचे चित्रण उदात्त व प्रेमळ असे ...". लोकसाहित्यात इतिहासाचे कणही विखुरलेले असतात. 'पन्हाळ दुर्गी राजा भोज' अशी ...मराठी लोककथेची सुरुवात आहे. मोगल सत्तेच्या जुलमी व अन्यायी राजवटीचे चित्रणही काही ...गीतांतून आढळते. उदा., मोगलांच्या हिंदू स्त्रियांवरील अत्याचारांचे चित्रण कुसुमावतीच्या एका ...त आढळते. राजस्थान, पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, बंगाल इ. प्रदेशांतील अनेक वीरगाथा ...हासिक सामग्री उपलब्ध करून देतात.

मराठी ओवीवाङ्मयात इंग्रजी सत्तेखालील राज्यातल्या विपरीत परिस्थीतीची प्रभावी ...आढळतात. "भारतातल्या वेगवेगळ्या प्रदेशांतल्या भौगोलिक स्थितीची निदर्शक अशी ...हीही लोकवाङ्मयात येतात. गंगा, यमुना, शरयू, शोण इ. नद्या काशी, प्रयाग, अयोध्या, जनकपूर ...ह्यांचे निर्देश आढळतात"[११]. वेगवेगळ्या प्रदेशांतील पारंपारिक पोषाख व वेशभूषा यांचेही ...त्या त्या भाषांतल्या लोकवाङ्मयात घडते. रंगांचे वैविध्य व वैचित्र्य आढळून येते. उदा., ...लोकगीतांमध्ये लाल व कुसुंबी हे रंग विशेषत्वाने येतात. पंजाबी स्त्रीला आसमानी रंगाचा ...विशेष आवडतो, असे लोकगीतांतल्या वर्णनांवरून जाणवते. लोकसाहित्यातील वृक्ष, वेली,



Scanned with OKEN Scanner

फळे, फुले यांचे निर्देश भारतीय प्रकृती-संस्कृतीला साजेसे, अनुरूप असतात. आंबा, डाळिंब, लिंब हे वृक्ष लोकजीवनाचे सहचर होत. लोकसाहित्यात जनमानसाच्या धार्मिक भावनाही प्रति- झालेल्या दिसतात. गंगा व तुळस या भारतीय स्त्रीच्या आदर्श देवता होत. त्यांचे उल्लेख आढळतात. मराठी लोकसाहित्यात पंढरपूर व विठोबा यांविषयीची श्रद्धा प्रकर्षाने प्रकटलेली येते.लोकसाहित्यातून सामान्यत: नैतिकता, श्रद्धा, सदाचरण आणि जनकल्याणाची, विश्वा- कामना यांचे चित्रण आढळते.

भारतातील वेगवेगळ्या भाषांमधल्या लोकसाहित्यात काही भिन्नत्वदर्शक वैशि- आढळतात. उदा., सर्व भारतीय भाषांमधल्या लोकसाहित्यात प्रेम हा समान विषय आहे. मराठीतच त्याचा काहीसा अपवाद आढळतो. हे वैशिष्ट्य दुर्गा भागवतांनी निदर्शनास आणून आहे. आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी यांसारख्या इंडो-आर्यन भाषांमध्ये राधा-कृष्ण हा प्रकर्षाने आढळतो पण दक्षिण भारतीय भाषांमधल्या लोकसाहित्यात त्याचे फारसे प्रचलन केरळमध्ये ख्रिस्ती व ज्यू उगमापासून निर्माण झालेले लोकसाहित्य विपुल आढळते इतर प्रांतात ते फारसे आढळत नाही. मुस्लिम प्रभाव बंगाली, मलयाळम् व उर्दू लोकसाहित्यात आढळतो.

**समारोप:** साधारणतः इ. स. सोळाव्या-सतराव्या शतकापर्यंत जगाच्या पश्चिम भागात मध्ययु- समाप्ती होऊन यंत्रप्रधान आधुनिक युगाला प्रारंभ झाला. भारतात ही परिस्थिती एकोणिसाव्या शतकात आली. मुद्रणयंत्राच्या शोधामुळे लिखित साहित्याची निर्मिती आणि प्रसार यांची लाट आणि त्याचवेळी मुद्रणपूर्व मौखिक परंपरेतील साहित्य व संस्कृती यांचे संग्रहण व अध्ययन करण्याची गरज अभ्यासकांना वाटू लागली. या साहित्यासाठी 'फोकलोअर' ही इंग्रजी संज्ञा सर्वप्रथम विल्यम जोन्स टॉमस या इंग्लिश पुरातत्वज्ञाने १८४६ मध्ये वापरली आणि जगभर ती रुळली. वर्तमान स्थितीत मराठीत 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजी 'फोकलोअर' शब्दाचा पर्यायशब्द म्हणून रुळला असला, तरी त्यातील 'साहित्य' हा शब्द मराठीत आधीच वाङ्मय (लिटरेचर) या अर्थाने रूढ असल्याने शब्दबद्ध (शाब्द) असे कथा, गीतादी साहित्य म्हणजेच लोकसाहित्य असे समजले जाते.

भारतीय समाजजीवनामध्ये 'लोक' हा शब्द प्राचीन काळापासून विविध अर्थांनी वापरला जातो. स्वर्ग, मृत्यू, पाताळ इ. त्रिभुवनांसाठी 'लोक' हे उत्तरपद म्हणून वापरले जाते. अमेरिका, जर्मनी, रशिया या वैज्ञानिक दृष्ट्या प्रगत असलेल्या राष्ट्रांतील विद्यापीठांमधून लोकसाहित्याभ्यासाच्या स्वतंत्र शाखा आहेत. या विषयावर मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती होत आहे. आकाशात झेप घेताना माणसाची मातीची ओढ संपत नसावी, म्हणूनच मानवमात्राचे आद्य समूहमन त्याला पुन्हा पुन्हा आपल्या मुळाकडे खेचत असावे. भारतातही अनेक विद्यापीठांतून लोकसाहित्याभ्यासाच्या स्वतंत्र शाखा सुरू झाल्या आहेत. अनेक मानव्यविद्याशाखांतील अभ्यासक एकत्रितपणे संशोधन करीत आहेत. फक्त मराठीतच त्याचा काहीसा अपवाद आढळतो. हे वैशिष्ट्य दुर्गा भागवतांनी निदर्शनास आणून दिले आहे. आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी यांसारख्या इंडो-आर्यन भाषांमध्ये राधा-कृष्ण हा विषय प्रकर्षाने आढळतो पण दक्षिण भारतीय भाषांमधल्या लोकसाहित्यात त्याचे फारसे प्रचलन दिसत नाही.

**संदर्भ:**

१. भागवत दुर्गा, लोकसाहित्य, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६७.

२. ढेरे, रा. चिं., 'लोकसंस्कृतीची क्षितिजे', पुणे, प्रथमावृत्ती, १९७१.

३. ढेरे, रा. चि., 'लोकसंस्कृतीचे उपासक', पुणे, द्वितीयावृत्ती, १९६४.
४. ढेरे, रा. चि., 'लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा', पुणे, प्रथमावृत्ती,१९९०.
५. बाबर सरोजिनी, संपा. 'लोकसाहित्य: भाषा आणि संस्कृति', पुणे, द्वितीयावृत्ती, १९६३.
६. भवाळकर तारा, 'लोकसाहित्यातील स्त्रीप्रतिमा', पुणे, प्रथमावृत्ती, १९८६.
७. भागवत दुर्गा, 'लोकसाहित्याची रुपरेखा', पुणे, प्रथमावृत्ती, १९७७.
८. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', पुणे, प्रथमावृत्ती, १९७५.
९. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरुप', औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८९.
१०. मोरजे गंगाधर, लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र', पुणे, प्रथमावृत्ती, १९८५.
११. व्यवहारे शरद, 'लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास', नागपूर, प्रथमावृत्ती, १९८७.



Scanned with OKEN Scanner